अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना अर्थसहाय्य या योजनेंतर्गत अंतिम हप्त्या करीता अर्थसहाय्य मंजूर करणेबाबत.
भाग्यलक्ष्मी मागासवर्गीय औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था मर्या. पंढरपूर जि.सोलापूर

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः मासाका-२०१८/प्र.क्र.१९४/अजाक

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०७ मार्च, २०१९

वाचा-

१) शासन निर्णय, सामजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.मासाका-२००९/प्र.क्र.२२०/विघयो-२ दिनांक २५.८.२००९

२) आयुक्त समाजकल्याण आयुक्तालय यांचे पत्र क्र.सकआ/अजाउयो-१/भाग्यलक्ष्मी-सोलापूर/ २०१८-१९ / का.१४ ८३० दिनांक १९.६.२०१८

प्रस्तावना-

अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना अर्थसहाय्य ही योजना सन २००४-२००५ मध्ये कार्यान्वित करण्यात आली आहे. यासाठी दरवर्षी आवश्यक ती तरतूद अर्थसंकल्पात केली जाते. प्रस्तुत योजनेसाठी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता रु.१०००.०० लाख भागभांडवल (लेखाशिर्ष ४२२५ ०४५ २) व रु.१०००.०० लाख दीर्घ मुदतीचे कर्ज (लेखाशिर्ष ६२२५ ०२५१) अशी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. यापूर्वी अर्थसहाय्य मंजूर व वितरीत केलेल्या संस्थापैकी ज्या संस्थांनी महाराष्ट्र शासनाचे नवीन औद्योगिक धोरण २०१३ अन्वये आवश्यक केलेल्या नोंदणी/कागदपत्रांची पूर्तता केलेली आहे, अशा संस्थांना उर्वरीत अर्थसहाय्य मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना अर्थसहाय्य या योजनेंतर्गत भाग्यलक्ष्मी मागासवर्गीय औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था मर्या. पंढरपूर जि.सोलापूर संस्थेस उर्वरीत अर्थसहाय्यांतर्गत दुसरा व अंतिम हप्ता शासकीय भागभांडवलापोटी रु. ११८.२७ लाख रुपये (रुपये एक कोटी अठरा लाख सत्तावीस हजार फक्त) व दिर्घ मुदतीचे कर्जा पोटी रु. ११८.२७ लाख रुपये (रुपये एक कोटी अठरा लाख सत्तावीस हजार फक्त) अस एकुण रुपये २३६.५४ (रुपये दोन कोटी छत्तीस लाख चोपन्न हजार फक्त) एवढे अर्थसहाय्य आयुक्त. समाजकल्याण, पुणे यांनी कळविलेल्या त्रुटींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून सन २०१८-१९ च्या उपलब्ध अनुदानातून वितरीत करण्यास शासन मान्यता

देत आहे. तसेच या विभागाच्या दि.६.११.२०१७ च्या शासन निर्णयातील निर्देशानुसार आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांनी कार्यवाही करावी.

२. यावर होणार खर्च पुढील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व चालू आर्थिक वर्षाकरीता मंजूर झालेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा:-

भागभांडवल रु. ११८.२७ लाख रुपये (रुपये एकशे अठरा लाख सत्तावीस हजार फक्त)

मागणी क्रमांक एन-४

४२२५-अनुसूचित जाती अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांच्या कल्याणावरील भांडवली खर्च

०१, अनुसूचित जातीचे कल्याण

१९०, सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणुका (पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना)

(०१)(०४) अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना भाग भांडवली अंशदान (४२२५ ०४५ २)

३२ अंशदाने

दिर्घ मुदतीचे कर्ज रु. ११८.२७ लाख रुपये (रुपये एकशे अठरा लाख सत्तावीस हजार फक्त)

मागणी क्रमांक एन-४

६२२५-अनुसूचित जाती अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांच्या कल्याणासाठी कर्ज

०१, अनुसूचित जातीचे कल्याण

८००, इतर कर्जे, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना (विघयो)

(०१)(०४) अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना कर्जे (६२२५ ०२५ १)

५५ कर्जे व आगाऊ रकमा

३. उपरोक्त निधी आहरीत केल्यानंतर आयुक्त (समाजकल्याण) यांनी त्यांचे अधिनस्त ठेवावा. त्रुटीची पुर्तता अहवाल प्राप्त झाल्यानंतर निधी वितरणाचा प्रस्ताव आयुक्त (समाजकल्याण) यांनी एक महिन्यात शासनास सादर करावा.

४. कर्जाची परतफेड संस्थेच्या देय असलेल्या प्रकल्प मुल्याच्या ७०% रक्कम अदा केल्यानंतर दोन वर्षांनी सुरू करण्यात यावी.

५. प्रस्तूत शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात झालेली रक्कम अटींची पूर्तता केल्यानंतर अदा करण्यासाठी याबाबत आयुक्त समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच देयकावर प्रती स्वाक्षरी करण्याचे अधिकारही त्यांना किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास देण्यात येत आहे. सदरहु तरतुद २०१८-१९ या आर्थिक वर्षात मंजुर करण्यात आलेल्या निधीतुन वितरीत करण्यात यावी. संदर्भाधीन शासन निर्णयातील इतर अटी व शर्ती कायम राहतील.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक २५.१.२०१९ च्या परिपत्रकातील अटीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३०८१६४३२३९२२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

DINGLE DINESH RAMCHANDRA

Digitally signed by DINGLE DINESH RAMCHANDRA
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=8612f2011cf8cde3b074d561cd711c17c6c3fd836467a8648a8d21dc84bc01be, postalCode=400032,
street=151 ANNEX,1ST FLOOR,MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=fc344849650ce07c3f9adc7e2cd4976b2852065e2acd65f7cee1828c10091458, ou=SOCIAL JUSTICE AND SPECIAL JUSTICE DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=DINGLE DINESH RAMCHANDRA
Date: 2019.03.11 15:08:04 +05'30'

(दि.रा.डिंगळे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. संचालक, उद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. जिल्हा कोषागार अधिकारी,पुणे,
४. प्रादेशिक उपयुक्त, समाजकल्याण विभाग, पुणे
५. सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, सोलापूर
६. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सोलापूर
७. प्रधान सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
८. वित्त विभाग (अर्थोपाय/अर्थसंकल्प३), मंत्रालय, मुंबई-३२
९. भाग्यलक्ष्मी मागासवर्गीय औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था मर्या. पंढरपूर जि.सोलापूर
१०.कार्यासन अधिकारी, अर्थसंकल्प कार्यासन, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.